POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

मराठी एकीकरण बातमीपत्र

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे


● वर्ष-०५ ● अंक-२७८ ● मुंबई, सोमवार, ११ मे २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

मुख्यमंत्री होताच थलपती विजय यांची मोठी घोषणा; राहुल गांधींच्या समोरच ठणकावून सांगितले...

‘सत्ताकेंद्र फक्त मीच असेन’

‘दुसरे कोणतेही पॉवर सेंटर चालणार नाही’

मुख्यमंत्री विजय यांचे हे पहिलेच विधान मित्रपक्ष आणि राजकीय विरोधक या दोघांसाठीही मोठा संदेश मानला जात आहे. ‘माझ्याव्यतिरिक्त दुसरे कोणतेही पॉवर सेंटर असणार नाही. सत्तेचे एकमेव केंद्र मीच राहीन,’ असे विजय यांनी ठामपणे सांगितले. त्यांच्या या विधानामुळे आघाडीतील घटक पक्षांवर त्यांचे पूर्ण नियंत्रण राहणार असल्याचे संकेत मिळत आहेत.



९ मंत्र्यांनीही घेतली शपथ

मंत्रीपदाची शपथ घेणारे नऊ व्यक्ती पुढीलप्रमाणे आहेत: ‘बुसी’ एन. आनंद, अधव अर्जुना, के.जी. अरुणराज, के.ए. सेनगोट्टैयन, पी. वेंकटरमणन, सी.टी.आर. निर्मलकुमार, ए. राजमोहन, टी.के. प्रभू आणि एस.

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

तामिळनाडूचे नवनिर्वाचित मुख्यमंत्री थलपती विजय यांनी शपथ घेतल्यानंतर मित्रपक्षांना मोठा इशारा दिला आहे. ‘सत्ताकेंद्र फक्त मीच असेन,’ असे म्हणत त्यांनी आपल्या कामाची दिशा स्पष्ट केली.

तामिळनाडूच्या राजकारणात गेल्या चार दिवसांपासून सुरू असलेल्या मोठ्या राजकीय सस्पेन्सचा अखेर ‘ब्लॉकबस्टर’ शेवट झाला आहे. तामिळनाडूचे सुपरस्टार आणि ‘टीव्हीके’ (TVK) पक्षाचे सर्वेसर्वा ‘थलपती’ सी. जोसेफ विजय यांनी काल राज्याच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली.

सत्तेच्या सिंहासनावर विराजमान झाल्यानंतर आपल्या पहिल्याच भाषणात त्यांनी स्पष्ट केले की, तामिळनाडूमध्ये आता सत्तेचे दुसरे कोणतेही केंद्र नसेल; सत्तेचे एकमेव केंद्र ते स्वतःच असतील.

राहुल गांधींचा ‘माझा भाऊ’ म्हणून उल्लेख

सरकार स्थापनेसाठी पाठिंबा देणाऱ्या सर्व नेत्यांचे विजय यांनी व्यासपीठावरून आभार मानले. यावेळी त्यांनी काँग्रेस खासदार आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांचा उल्लेख ‘माय ब्रदर’ (माझा भाऊ) असा केला. विजय यांनी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, के. सी. वेणुगोपाल, सेल्वापेरुंथगई आणि प्रवीण चक्रवर्ती यांचे विशेष आभार मानले. तसेच माकप (CPI-M), व्हीसीके (VCK) आणि भाकप (CPI) च्या नेत्यांनाही धन्यवाद दिले. आपल्या सोशल मीडिया वॉरियर्सचे आणि कार्यकर्त्यांचे आभार मानताना ते भावूक झाले होते.

चुकीचे इरादे असणाऱ्यांना इशारा: ‘मी थम्बी आहे’

आपल्या संबोधनात स्वतःचा उल्लेख ‘थम्बी’ (लहान भाऊ) असा करत विजय यांनी मित्रपक्षांच्या दबावाला बळी पडणार नसल्याचे स्पष्ट केले. विरोधकांना इशारा देताना ते म्हणाले, ‘मी स्वतः काहीही चुकीचे करणार नाही आणि माझ्या सोबत कोणाला चुकीचे करू देणार नाही. जर कोणाच्या मनात चुकीचे इरादे असतील, तर त्यांनी ते त्वरित सोडून दिले पाहिजेत.’ त्यांच्या या आक्रमक पवित्र्यामुळे प्रशासनावर त्यांची घट्ट पकड असल्याचे दिसून आले.

‘मी देवदूत नाही, तर एक सामान्य माणूस’

‘मी कोणी देवदूत नाही, मी तुमच्यासारखाच एक सामान्य माणूस आहे,’ असे म्हणत विजय यांनी जनतेला साद घातली. आपण दिलेली आश्वासने पूर्ण करण्यासाठी त्यांनी जनतेकडे थोडा वेळ मागितला आहे. ‘मी अशी कोणतीही आश्वासने देणार नाही जी मी पूर्ण करू शकणार नाही. मात्र, तुमच्या सर्वांच्या सोबतीने आपण अशक्य गोष्टीही साध्य करू शकतो असा मला विश्वास आहे. मला थोडा वेळ द्या, मी हळूहळू सर्व आश्वासने पूर्ण करेन. जनतेच्या एका पैशालाही मी हात लावणार नाही,’ अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

भारताची संरक्षण क्षेत्रात मोठी झेप!

हजारो किमीवरील लक्ष्य भेदणाऱ्या ‘अग्नी’ क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी



‘हायपरसोनिक ग्लाइड व्हेईकल’ तंत्रज्ञानाचा समावेश?

ही उड्डाण चाचणी ह्यसंरक्षण संशोधन आणि विकास संस्था (डीआरडीओ) आणि ‘स्ट्रॅटेजिक फोर्सेस कमांड’ (एसएफसी) यांच्या संयुक्त प्रयत्नांतून यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आली. या क्षेपणास्त्राची रचना अशा प्रकारे करण्यात आली होती की, ते हिंदी महासागर क्षेत्रातील एका विस्तृत भौगोलिक पट्ट्यात पसरलेल्या विविध उद्दिष्टांना स्वतंत्रपणे लक्ष्य करण्यास सक्षम असलेल्या अनेक पेलोड्सना वाहून नेऊ शकेल, या चाचणीमध्ये ‘अग्नी-५’ ची एक प्रगत आवृत्ती किंवा कदाचित तिची पुढील पिढीतील आवृत्ती जसे की एमके २ वापरली गेली असावी, असा अंदाज आहे. जिच्यामध्ये एमआयआरव्ही क्षमतेसोबतच संभाव्य ‘हायपरसोनिक ग्लाइड व्हेईकल’ सारख्या तंत्रज्ञानाचाही समावेश असू शकतो.

■नवी दिल्ली। प्रतिनिधी,

भारताच्या संरक्षण क्षेत्रासाठी एक अत्यंत महत्त्वाची आणि गौरवशाली बातमी आहे. भारताने एमआयआरव्ही तंत्रज्ञानाने सुसज्ज असलेल्या म्हणजेच एकाच क्षेपणास्त्राद्वारे हजारो किमी अंतरावरील वेगवेगळ्या लक्ष्यांवर स्वतंत्रपणे अण्वस्त्रे डागली जाऊ शकतात, अशा प्रगत ‘अग्नी’ क्षेपणाखाच्या यशस्वी चाचणी केली आहे. ही कामगिरी देशाच्या धोरणात्मक संरक्षण क्षमतांना नव्या उंचीवर घेऊन जाणारी आहे. या चाचणीचा लक्षणीय प्रभाव थेट बांगलादेशपर्यंत दिसून आला होता. या घटनेनंतर भारताने नेमके कशाचे प्रक्षेपण केले आहे, याबद्दलच्या चर्चा आणि तर्कवितर्कांना उधाण आले!

‘अग्नी’ एमआयआरव्ही या क्षेपणास्त्राची चाचणी शुक्रवारी ओडिशाच्या किनाऱ्यालगत असलेल्या डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम बेटावरून करण्यात आली. या चाचणीदरम्यान, क्षेपणास्त्राने वाहून नेलेले अनेक ह्यपेलो (युद्धसामग्री), हिंदी महासागर क्षेत्रातील एका विशाल भौगोलिक पट्ट्यात विखुरलेल्या विविध लक्ष्यांवर अत्यंत अचूकपणे आदळले.

एमआयआरव्हीची वैशिष्ट्ये

एमआयआरव्ही तंत्रज्ञानाचे सर्वांत महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य म्हणजे, एकाच क्षेपणास्त्रावर अनेक ‘वॉरहेड्स’ (पेलोड्स) वाहून नेण्याची त्याची क्षमता.

है तंत्रज्ञान वेगवेगळ्या ठिकाणी स्थित असलेल्या उद्दिष्टांना एकाच वेळी, अत्यंत अचूकपणे लक्ष्य करून नष्ट करते. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर, प्रत्येक वॉरहेड स्वतःच्या अशा एका विशिष्ट मार्गावरून प्रवास करते, ज्यामुळे शेकडो किलोमीटर अंतरावर असलेल्या लक्ष्यांवर अचूक मारा करणे त्याला शक्य होते.

क्षेपणास्त्र संरक्षण प्रणालीना चकमा देण्यासाठी ही क्षमता अत्यंत प्रभावी ठरते आणि भारताच्या अणु-प्रतिबंधक लक्षणीय वाढ करते. भारताने यापूर्वी मार्च २०२४ मध्ये ‘मिशन दिव्यास्त्र’ अंतर्गत ‘अग्नी-५’ क्षेपणास्त्राची एमआयआरव्ही चाचणी केली होती, तथापि, ही अद्ययावत चाचणी त्याहूनही अधिक प्रगत प्रणालीची सिद्धता करते.

मुंबईकरांचे पाणी आता अधिक शुद्ध होणार! जलशुद्धीकरण प्रकल्पाची क्षमता वाढणार




■मुंबई। प्रतिनिधी,

मुंबई शहर आणि उपनगराला पाणी पुरवठाकरण्यासाठी पिसे पांजरापूर येथील संकुलात असलेल्या जलशुद्धीकरण प्रकल्पाची क्षमता वाढवण्यात येणार आहे. मुंबई महापालिकेने या संकुलात प्रतिदिन ९१० दशलक्ष लिटर क्षमतेचा नवीन जलशुद्धीकरण प्रकल्प उभारण्याचे ठरवले आहे. याकरीता कंत्राटदार नेमण्यात आले असून, प्रकल्प सल्लागार नेमण्याची प्रक्रिया सुरू आहे. त्यामुळे या प्रकल्पाचे काम लवकरच मार्गी लागणार आहे.मुंबई शहर आणि उपनगर भागस स्वच्छ व शुद्ध पाण्याचा पुरवठा व्हावा यासाठी भातसा नदीच्या पाण्यावर पिसे पांजरापूर संकुलातील पांजरापूर जलशुद्धीकरण प्रकल्पात प्रक्रिया केली जाते. आशिया खंडातील सर्वात मोठे जलशुद्धीकरण केंद्र म्हणून प्रख्यात असलेल्या या संकुलातील जलशुद्धीकरण केंद्रातून मुंबई महानगरपालिकेच्या प्रमुख भागांना पाणीपुरवठा केला जातो. हा प्रकल्प तीन टप्प्यांत बांधण्यात आला आहे. नवीन केंद्र बांधण्यास आणखी काही वर्षे लागू शकतात. त्यामुळे मुंबईकरांचा पाणीपुरवठा बाधित होऊ नये म्हणून पालिकेने याच संकुलात ९१० दशलक्ष लिटर प्रतिदिन क्षमतेचा एक जलशुद्धीकरण प्रकल्प उभारण्याचे ठरवले आहे. हा नवीन प्रकल्प उभारल्यानंतर जुन्या प्रकल्पातील सर्वात जुना पहिला टप्पा बंद करण्यात येणार आहे. पहिल्या टप्यातील जलशुद्धीकरण केंद्र १९७९ मध्ये म्हणजेच ४६ वर्षांपूर्वी बांधण्यात आले आहे. वर्षानुर्वर्षे क्लोरीनसारख्या रसायनांच्या सतत संपर्कात आल्यामुळे याच्या संरचनेची झीज झाली आहे.

धक्कादायक ! दररोज 28 शेतकरी करत आहेत आत्महत्या; सर्वाधिक संख्या महाराष्ट्रात

■नवी दिल्ली। प्रतिनिधी,

२०२४ मध्ये भारतातील शेतकरी आणि शेतमजुरांमधील आत्महत्येचे संकट गंभीर राहिले, राष्ट्रीय गुन्हे नोंदणी ब्युरो (एनसीआरबी) नुसार, २०२४ मध्ये कृषी क्षेत्राशी संबंधित एकूण १०५४६ लोकांनी आत्महत्या केली. ही संख्या २०२३ मधील १०७८६ प्रकरणांपेक्षा किंचित कमी असली तरी, देशात दररोज सरासरी सुमारे २८ शेतकरी आत्महत्या करत आहेत. याचा अर्थ भारतात आजही दर तासाला एक शेतकरी किंवा शेतमजूर आपले जीवन संपवतो. अहवालानुसार, देशात नोंदवलेल्या एकूण १७०७४६ आत्महत्यांपैकी ६.२ टक्के आत्महत्या कृषी क्षेत्रातील होत्या. आत्महत्या करणाऱ्यांमध्ये शेतमजुरांचा वाटा सातत्याने वाढत आहे. १०५४६ लोकांपैकी ५९१३ शेतमजूर होते, जे एकूण संख्येच्या ५६% होते. २०२० मध्ये शेतमजुरांचा वाटा ४७.७५% होता, परंतु तेव्हापासून त्यात सातत्याने वाढ होत आहे. तज्ज्ञांनी बऱ्याच काळापासून हे निदर्शनास आणले आहे की, ग्रामीण कुटुंबे शेतीतून मिळणाऱ्या उत्पन्नाऐवजी मजुरीवर अधिकाधिक अवलंबून आहेत, ज्यामुळे आर्थिक असुरक्षितता आणखी वाढत आहे. २०२२ मध्ये कृषी क्षेत्रातील आत्महत्यांची संख्या ११२९० वर पोहोचली, जी अलिकडच्या वर्षांतील सर्वाधिक संख्या आहे. तेव्हापासून त्यात सातत्याने घट झाली आहे, परंतु सध्याची आकडेवारी जमिनीवरील परिस्थितीत कोणताही महत्त्वपूर्ण बदल दर्शवत नाही. महाराष्ट्रात सर्वाधिक ३८२४ कृषी आत्महत्यांची नोंद झाली, जे देशातील एकूण कृषी आत्महत्यांच्या ३६.२६ टक्के आहे. त्यानंतर कर्नाटकात २.९७१ प्रकरणे नोंदवली गेली. मध्य प्रदेशात ८३५, आंध्र प्रदेशात ७८०, तामिळनाडूमध्ये ५०३ आणि छत्तीसगडमध्ये ४८६ आत्महत्यांची नोंद झाली. महाराष्ट्र, कर्नाटक आणि मध्य प्रदेशच्या तुलनेत उत्तर प्रदेश आणि बिहारसारख्या प्रमुख कृषीप्रधान राज्यांमध्ये शेतकरी आत्महत्यांची संख्या लक्षणीयरीत्या कमी नोंदवली गेली.



आंध्र प्रदेशातही वाढतोय आकडा

याउलट, आंध्र प्रदेशात शेतकरी आत्महत्यांमध्ये १५.६७ टक्के घट नोंदवली गेली. पुदुचेरीमध्ये तिप्पटीहून अधिक वाढ दिसून आली. २०१९ ते २०२२ या काळात पुदुचेरीमध्ये एकही शेतकरी आत्महत्या नोंदवली गेली नाही. मात्र, २०२३ मध्ये १० प्रकरणे नोंदवली गेली आणि २०२४ मध्ये ही संख्या ३३ पर्यंत वाढली.

2024 मध्ये सर्वाधिक वाढ

अहवालानुसार, २०२३ च्या तुलनेत २०२४ मध्ये कर्नाटकात आत्महत्यांमध्ये सर्वाधिक २२.६१ टक्के वाढ नोंदवली गेली, यानंतर राजस्थान (१४ टक्के) आणि मध्य प्रदेश (७.४६ टक्के) यांचा क्रमांक लागतो.



पुणे

मोर्चा: नसरापूर प्रकरणातील आरोपी कांबळे यास फाशीची शिक्षा झाली पाहिजे या मागणी सह पुण्यातील कायदा सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलिसांनी कठोर पावले उचलावी त्या मागणीसाठी आक्रोश मोर्चाचे आयोजन केले होते. याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



नाशिक ‘कॉर्पोरेट जिहाद’ प्रकरणी ५० पानांचा अहवाल मुख्यमंत्र्यांना सादर

■मुंबई। प्रतिनिधी,

नाशिकमधील बहुराष्ट्रीय कंपनीतील कॉर्पोरेट जिहाद प्रकरणी सखोल चौकशी करून राष्ट्रीय महिला आयोगाने तयार केलेला ५० पानांहून अधिकचा सविस्तर अहवाल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सादर केला आहे. या अहवालात आयोगाने २५ हून अधिक महत्त्वपूर्ण शिफारसी केल्या असून, या शिफारसींनुसार दोषींवर कठोर कारवाई करण्याचे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिले आहे. नाशिकमधील या गंभीर प्रकरणाची दखल घेत मुंबई उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायमूर्ती साधना जाधव यांच्या अध्यक्षतेखाली एक विशेष तथ्यशोधन समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीत हरियाणाचे माजी पोलीस महासंचालक बी. के. सिन्हा, सर्वोच्च न्यायालयाच्या वकील मोनिका अरोरा आणि आयोगाच्या वरिष्ठ समन्वयक लीलाबती यांचा समावेश होता. समितीने १८ व १९ एप्रिल रोजी नाशिकचा दौरा करून पीडित महिला, पोलीस अधिकारी आणि संबंधित घटकांशी सविस्तर चर्चा केली. या चर्चेतून समोर आलेल्या निष्कर्षांच्या आधारे राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी हा अहवाल मुख्यमंत्र्यांकडे सुपूर्द केला. मुख्यमंत्र्यांना सादर केलेल्या अहवालात कार्यस्थळी महिलांची सुरक्षितता, त्यांचा सन्मान आणि न्याय सुनिश्चित करण्यावर विशेष भर देण्यात आला आहे. जबाबदारी निश्चित करण्यासाठी विविध उपाययोजना सुचवतानाच, जबाबदार व्यक्तींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची गरज समितीने अधोरेखित केली आहे. या प्रकरणातील मुख्य संशयित निदा खान हिला पोलिसांनी अटक केली असून तिला तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. धक्कादायक बाब म्हणजे, निदा खानला लपवून ठेवण्यात 'एमआयएम'च्या एका नगरसेवकाचा हात असल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले आहे. पोलिसांनी नगरसेवक मतीन पटेलला ताब्यात घेऊन या प्रकरणात सहआरोपी केले आहे.



संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

नेमेचि येते टंचाई...



ग्रामीण- शहरी भागांतील पाणीटंचाईची कारणेही निरनिराळी आहेत. असंतुलित विकासामुळे शिक्षण व रोजगार संधींअभावी स्थलांतरामुळे शहरीकरण आणि औद्योगिकरणामुळे बहुसंख्य शहरांत पाणी पुरवणे, हे आव्हान ठरले आहे. पुण्यासारख्या शहराच्या डोक्याशी चार धरणे असूनही वाढत्या लोकसंख्येला ते पाणी पुरत नाही. एप्रिल महिना सरत नाही, तोच महाराष्ट्राच्या विविध भागांमध्ये पाणीटंचाईच्या झळा सुरू झाल्या आहेत. काही अपवाद वगळता ग्रामीण भागापासून ते विकसित शहरांपर्यंत कोणाचीही या टंचाईतून सुटका होण्याची शक्यता दिसत नाही. मुंबई-कोल्हापूरसारख्या शहरांमध्ये आत्ताच पाणीकपातीचा निर्णय घेण्यात आला आहे; तर मराठवाड्याच्या अनेक भागांमध्ये पाणीटंचाई पाचवीलाच पुजल्याने शेकडो टँकर सुरू झाले आहेत. राजधानी मुंबईच्या शेजारील ठाणे, कल्याण-डोंबिवली आणि भिवंडीसारख्या शहरांमध्ये टंचाईचे चटके बसू लागले आहेत. पुण्यासारख्या शहरात अघोषित कपात सुरू झाली आहे, तर अनेक शहरांत आठवड्यातून एकदाच मिळणाऱ्या पाण्यातच जनता समाधान मानत आहे. पिण्याच्या पाण्यासाठी पायपीट करणाऱ्या वाड्या-वस्त्यांमधील बायाबापड्यांच्या डोक्यावरील हंडा या जन्मात तरी उतरणार का, हा प्रश्न विचारण्यापलीकडे गेला आहे. त्यातच यंदा एल निनो मुळे अपुरा पाऊस होणार असल्याचा अंदाज असून, पावसाचे आगमनही वेळेत होणार का, हे सांगता येत नाही. दमदार पाऊस होऊन जलस्रोत भरेपर्यंत, म्हणजे किमान दीड महिना तरी पाणीसाठा पुरवून वापरण्याशिवाय पर्याय नाही. गेल्या वर्षी ज्या मराठवाड्यात बंधारे फुटेपर्यंत पाऊस झाला, तेथे काही महिन्यांतच या टंचाईची सर्वाधिक भीषणता जाणवावी, यासारखा दैवदुर्विलास नाही. त्यासह राज्याच्या बहुसंख्य भागांत अतिवृष्टी झाल्यानंतरही पाण्यासाठी वणवण करण्याची वेळ नागरिकांवर का यावी, हा प्रश्नच आहे. त्यासाठी केवळ निसर्गाच्या अवकृपेकडे बोट दाखवून चालणार नाही; नियोजन-व्यवस्थापनाचा अभाव आणि सरकारी अकार्यक्षमतेचे हे परिणाम आहेत. मुळातच महाराष्ट्रात पावसाचे प्रमाण अपुरे आणि सिंचनावरही मयार्दा आहेत. पुणेकर दोनदा अंघोळ करतात, अशी बालिश वक्तव्ये करून ग्रामीण विरुद्ध शहरी असा वाद पेटवून किंवा वरवरच्या उपाययोजना मांडून मूळ प्रश्नांकडे केली जाणारी सोयीस्कर डोळेझाक कधी तरी थांबवली पाहिजे. पुण्यातील पाणीपुरवठा व्यवस्थेमध्ये तब्बल ४० टक्के गळती होते; त्यात वितरणातील त्रुटींबरोबरच पाणीचोरीचाही मोठा वाटा आहे. हे रोखण्यासाठी जलवाहिन्यांतून पाणी पुरवणे, जुन्या जलवाहिन्या बदलणे अशी कामे तातडीने हाती घेण्यास महापालिका किंवा राज्य सरकारचे हात कोणी बांधले आहेत? पुणे शहराला २४ तास पाणीपुरवठा करू, अशी घोषणा करून दशकभराचा काळ लोटला; पण अजूनही योजनेच्या टाक्यांची कामे रखडलेली असून, उलटपक्षी आठवड्याला २४ तास पाणीपुरवठा बंद राहतो. पूर्वीच्या आश्वासनांचे कारभाऱ्यांना सोयरसुतकही नाही. लातूर, छत्रपती संभाजीनगर किंवा जालन्यासारख्या शहरांतही नागरिकांच्या पदरी फक्त आश्वासनेच आली आहेत. कमी पाऊसमान आणि सिंचनव्यवस्थेवरील मयार्दा लक्षात घेता, पाण्याची बचत आणि फेरवापरावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. उजनीसारखे शंभर अब्ज घनफूट (टीएमसी) क्षमतेचे धरण दर वर्षी रिकामे होते आणि त्याच महाकाय धरणाशेजारील सोलापूर शहराला आठवड्यातून एकदा पाणी मिळते, याची कोणालाही खंत वाटत नाही. सर्वाधिक पाणीवापर असलेल्या ऊसासाठी ठिबक-तुषार सिंचनाचा प्रसार करण्यात सरकारला अजूनही यश आलेले नाही आणि त्यासाठी पुरेसे प्रयत्नही होताना दिसत नाहीत. महाराष्ट्रात पाण्याचा फेरवापर करण्याचे प्रमाण अवघे चार टक्के आहे. नियोजन आणि अंमलबजावणीची कूर्मगती पाहता पाच वर्षांत ते प्रमाण ४० टक्क्यांवर नेण्याचे उद्दिष्ट साध्य होण्याची शक्यता दिसत नाही. हे तंत्रज्ञान आवाक्यात आणणे आणि प्रक्रियायुक्त पाणी वापरण्यास शेतकऱ्यांना राजी करण्याचे आव्हान आहे. कोट्यवधी रुपयांच्या खचार्नंतरही जलयुक्त शिवार किंवा जलजीवन मिशन सारख्या योजनांचे सर्वदूर परिणाम दिसलेले नाहीत. टंचाई-दुष्काळाची चाहूल लागल्यावरच सरकारला जाग येते आणि पाऊस झाल्यावर सर्व घोषणा हवेत विरतात. ही मानसिकता बदलली नाही, तर दुष्काळमुक्तीच्या घोषणा भाषणांपुरत्याच राहतील, यात प्रत्यवाय नसावा.



गोष्टींची गोष्ट

उन्हाळा वाढला आहे. घामाच्या धारा लागल्या आहेत. काम करायची इच्छा होत नाही. सतत काम पुढे ढकलावसं वाटतं. पुढे तुंबलेली कामं उलटतात. अंगावर चालून येतात. कामांची भीती वाटते. कामं न करण्याचीही भीती वाटते. बाहेरचं वातावरण घाबरवणारं आहे. आता घाबरून लिहायला बसलो आहे. घशाला कोरड पडली आहे. दोन-चार महत्त्वाच्या समस्या अंगाला चाटून गेल्या. पण धीर होत नाही. सुरुवातीलाच शेवट लिहून मोकळं व्हावं अशी इच्छा होते आहे. डोक्यावर पंखा गरागरा फिरतो आहे. तो थकल्यासारखा वाटतो. पंखा फास्ट करायची इच्छा होते. पण अजून फास्ट केला तर पंखा खिडकीतून उडून तर जाणार नाही ना- अशी भीती वाटते.

सतत प्लास्टिकच्या बाटलीतलं शुद्ध पाणी पितो आहे. त्यामुळे आतले ज्वलंत विचार पातळ तर होणार नाहीत ना- अशी भीती मनाला भेडसावते आहे. वैचारिक उन्हाळ्याच्या रखरखाटात काय लिहावं असा प्रश्न पडला आहे. आजच्या लेखात काही पातळ गोष्टी सांगाव्यात असं मनात आहे. ही अलीकडेच घडलेली गोष्ट आहे. मी विनाकारण घाईगडबडीत होतो. त्यामुळे समोर दिसेल ती टॅक्सी पकडली. ड्रायव्हर सज्जन दिसत होता. त्याने बसल्या, बसल्या हसून माझं स्वागत केलं. स्वागताची सवय नसल्याने गलबलल्यासारखं झालं. मी कुठे जायचं ते सांगितलं. तो म्हणाला, चिंता नको, तुम्ही तू म्हणाल तिथे जाऊ. टॅक्सी रस्त्याला लागली. तो मोबाइलवर पुटपुटल्यासारखा बोलू लागला. तो बायकोशी बोलत होता. त्याच्या बोलण्यावरून त्याच्या घरी काहीतरी मोठी अडचण झाली असावी असं जाणवत होतं. मी त्याच्या बोलण्यातले तपशील गोळा करून, जोडून गोष्ट समजावून घेत होतो.

ड्रायव्हरचा मुलगा आजारी होता. जरा जास्तच आजारी होता. ड्रायव्हरचं वय बघता मुलगा दहा-बारा वर्षांचा असावा असं वाटत होतं. अर्थात बालवयातच लग्न झालं असेल तर मुलगा पंचविशीतलाही असू शकेल असं मनात येऊन गेलं. मुलाची ट्रीटमेंट सुरू होती. गेल्या दोन महिन्यांपासून बायको त्याला हॉस्पिटलात घेऊन जात होती. पण प्रकृतीत फरक पडत नव्हता. आता खूपच ताप चढला होता. मुलाला तत्काळ मोठ्या डॉक्टरांकडे नेणं गरजेचं होतं. तो हताश झाला होता. बायकोशी भांडत होता. धंदा नाही, पैसा नाही म्हणत होता. समोरच्या आरशात बघितलं तर त्याच्या डोळ्यात पाणी होतं. शेवटी हरल्यासारखा चिडून म्हणाला, ह्यमी काय करू - त्याचं जे व्हायचं ते होऊ दे. टॅक्सी हलली, मी घाबरलो. त्याने फोन बंद केला. ही गोष्ट काळजात घुसली.

माज्या पाकिटात पाचशेच्या सुमारे चार नोटा होत्या. चार नोटा त्याला द्याव्यात आणि आपण संसारातून मोकळं व्हावं असा विचार मनात आला. पण टॅक्सीतून उतरताना त्याचं भाडं आणि गोष्टीचे हजार रुपये दिले. बरं वाटलं, हलकं वाटलं. गदगदून ही गोष्ट काही मित्रांना ऐकवली. पण त्यांना आश्चर्य वाटलं नाही. त्यांच्या काळजात कळही उठली नाही. त्यांनाही असाच एक टॅक्सी ड्रायव्हर भेटल्याचं कळलं. फक्त त्यांच्या गोष्टीतले काही तपशील वेगळे होते. मुंबईच्या टॅक्सी, रिक्षा प्रवासात ही करुण कहाणी कानावर पडते असं म्हणतात. टॅक्सी, रिक्षा ड्रायव्हरांचे कुठे प्रशिक्षण वर्ग चालतात का, त्यांना साहित्याचा अभ्यास म्हणून ही गोष्ट शिकवली जाते का, असे काही प्रश्न पडतात. उत्तरं सापडत नाहीत.

पूर्वी चाकू सुऱ्यांचा धाक दाखवून लुटत. आता कुणी हिंसेच्या भानगडीत पडत नाही. हिंसा परवडतही नाही. सगळे शांत अहिंसेच्या मागार्नेच चालतात. काळजाला डिवचणाऱ्या गोष्टी सांगून लुटतात. जे लुटले जातात त्यांचीही काही तक्रार नसते. आपण अडल्या-नडल्यांना मदत करू शकलो असा आनंद मिळतोच. खोट्या आनंदातही गम्मत असते. अनेकदा खोटा आनंदच भारी वाटू लागतो. असो! मानव जातीच्या जन्माबरोबरच गोष्टीही जन्माला आल्या असं म्हणतात. गोष्ट सांगावीशी, गोष्ट ऐकावीशी वाटते. ती माणसांची गरज आहे. रोटी, कपडा, मकानपेक्षा जास्त महत्त्वाची गरज आहे माणसांना एकत्र बांधून ठेवण्यासाठी, समाज घडवण्यासाठी, माणसांना शहाणं करण्यासाठी गोष्टींचा जन्म झाला असं म्हणतात. गोष्ट छोट्यांना शांत झोपवते आणि मोठ्यांना टक्क जागं ठेवते. गोष्टींशिवाय माणसाला जगता येत नाही.

गोष्टींना आपल्या आत दडवू नये असं म्हणतात. आत दडवलेल्या गोष्टी त्रास देतात. पोखरत राहतात. गोष्ट दडवू नका असं म्हणणाऱ्या अनेक लोककथा आपल्याकडे प्रसिद्ध आहेत.

एका गोष्ट दडवणाऱ्या म्हातारीची गोष्ट अशी-

एक म्हातारी आपल्या घरात मुला-बाळा, लेकी-सुनांसोबत राहत होती. म्हातारीचं कुणी ऐकत नव्हतं. सगळे मिळून तिला छळत होते. आपली गोष्ट सांगावी असं कुणीच जवळपास नव्हतं. एक दिवस दुःखी म्हातारी एकटीच घराबाहेर पडली. चालत राहिली. गाव मागे पडलं. ती एका निर्जन पडक्या घरासमोर उभी राहिली. त्या घराला दार नव्हतं, खिडक्या नव्हत्या, छप्परही नव्हतं. फक्त पडक्या भिंती होत्या. म्हातारी एका भिंतीसमोर उभी राहिली. तिने भिंतीला आपली करुण कहाणी ऐकवली. भिंत कोसळून पडली. दुसऱ्या भिंतीला गोष्ट ऐकवली. ती भिंतही मोडून पडली. सर्व भिंती कोसळल्या. म्हातारी रिती झाली. तिला आनंद वाटू लागला. घरातलेही आनंदाने तिच्या भोवती गोळा झाले, तिच्या गोष्टी ऐकू लागले. शेवटी मनातल्या खऱ्या गोष्टी सांगितल्या की भिंती गळून पडतात यावर विश्वास ठेवावा लागतो.

हल्ली गोष्टींचा संशय येतो. गोष्टी आपल्याला गंडवू लागल्या आहेत की काय अशी भीती वाटते.

मध्यंतरी झाडावर कळप करून राहणाऱ्या माकडांवर झालेलं एक संशोधन वाचनात आलं होतं. त्या माकडांची गोष्ट अशी-

माकडं अत्यंत सावध असतात. त्यांचं सर्वत्र नीट लक्ष असतं. खालून किंवा वरून हल्ला होणार असेल तर ते विशिष्ट आवाज काढून इतरांना सावध करतात. हा विशिष्ट आवाज म्हणजे माकडांची गोष्ट असं म्हणता येईल. वरून हल्ला होणार असेल तर आवाज वेगळा, गोष्ट वेगळी असते. खालून धोका असेल तर उड्या मारत, चित्कारत ऐकवलेली गोष्ट वेगळी असते. माकडांच्या अभ्यासात असं आढळलं की माकडं काही वेळा मुद्दाम चुकीचे आवाज काढतात आणि आपल्या समाजात गोंधळ उडवून गम्मत बघत बसतात. खोट्या गोष्टी समाजात पसरवून गम्मत बघणाऱ्या माकडांचे आपण वंशज आहोत.

खोट्या गोष्टी सांगून लुटता येतं. दंगली घडवता येतात. वस्त्या पेटवता येतात. देश बेचिराख करता येतात. सकाळी वर्तमानपत्रात युद्धाचे फोटो बघितले की, खोट्या गोष्टी पसरवणाऱ्या माकडांची आठवण येते.

माकडांच्या गंडवणाऱ्या गोष्टीत एक गम्मत आहे. माणसांच्या गंडवणाऱ्या गोष्टीत एक विध्वंस दडलेला आहे. आता गोष्टींवर विश्वास ठेवता येत नाही. लबाड गोष्टी आपल्या मागावर आहेत.

कुणावर विश्वास टाकावा असे दिवस आता उरले नाहीत. इथे एक सुफी गोष्ट आठवते.

मुल्लाचा एक जिवलग मित्र मुल्लाला भेटायला गेला. मित्राची अडचण होती. त्याचं गाढव अचानक आजारी पडल्यामुळे त्याची सगळी कामं खोळंबली होती. मित्राने मुल्लाला अडचण सांगितली. त्याला फक्त एका दिवसासाठी गाढवाची गरज होती. मुल्लाने अडचण समजावून घेतली आणि दुःखी होऊन म्हणाला, मला तुझी अडचण कळते. मी माझं गाढव तुला दिलं असतं पण सकाळीच दुसरा एकजण गाढव घेऊन गेला. तेवढ्यात मुल्लाने घरामागे बांधून ठेवलेलं गाढव ओरडू लागलं. मित्राला वाईट वाटलं. गंडवणारी गोष्ट जिव्हारी लागली. तो म्हणाला, ह्यतू आपल्या जिवलग मित्राशी खोटं बोललास. घरात गाढव असतानाही गाढव नाही म्हणालास. मुल्ला म्हणाला, तू माझा जिवलग मित्र. तू आपल्या मित्रावर विश्वास ठेवशील की त्या गाढवावर विश्वास ठेवशील? आता मित्र कोण, गाढव कोण कुणाच्या गोष्टीवर विश्वास ठेवायचा हे कळत नाही. गंडवणाऱ्या गोष्टींचं करायचं काय असा प्रश्न पडतो.

हिटलर चांगला चित्रकार होता. तो चित्रातून माणसांच्या आतल्या, बाहेरच्या गोष्टी सहज रंगवू शकला असता. पण त्याने चित्रं काढली नाहीत. त्याने दुसऱ्या महायुद्धाची विध्वंसक गोष्ट रचली. महायुद्ध घडवून आणलं. महायुद्ध सोपं असतं. भिंती पाडणाऱ्या गोष्टी रचणं अवघड असतं.

युद्धाची घाई झालेले अनेक लेखक आता खऱ्या गोष्टी सांगत नाहीत. ते तिसऱ्या महायुद्धाच्या तयारीला लागले आहेत. आपण सावध असायला हवं. इतरांना सावध करणाऱ्या गोष्टी रचायला हव्यात.



सशक्त शैक्षणिक क्रांती !

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांचा अभ्यास आणि भारतातील शिक्षण क्षेत्रातील क्रांतीची गरज लक्षात घेता, वास्तविक जीवन आणि जगातील शिक्षण अभ्यासक्रमात अंतर्भूत व्हायला हवे. ही जबाबदारी व्यवस्थेबरोबरच शिक्षकांच्या खांद्यांवर आहे हे विसरून चालणार नाही. त्यामुळे त्यांच्या समस्या जाणून घेतल्या पाहिजेत. सशक्त शिक्षण क्रांतीच्या दिशेने जाताना हेही विसरता कामा नये की, शिक्षण समग्र, संवेदनशील, वैचारिक, निर्मिक, वास्तविक, वैज्ञानिक, तांत्रिक, निर्भीड व सुसंस्कृतपणा जपणारे हवे.

प्रगत किंवा विकसित राष्ट्रांच्या इतिहासात डोकावून पाहिले तर त्यांचा विकास हा औद्योगिक आणि राजकिय क्रांतीनेच झालेला आहे असे नाही तर तो एका सशक्त शैक्षणिक धोरणांच्या क्रांतीने झालेला आहे हे लक्षात येते. ऐतिहासिक पुरावे दर्शवतात की, ज्या देशांनी शिक्षणाला प्राधान्य दिले आहे, त्यांनी जलद प्रगती साधली आहे. म्हणून भारताचा सर्वांगीण विकास सुनिश्चित करण्यासाठी आणि येथील तरुणांना जागतिक स्तरावर सक्षम बनवण्यासाठी एका सशक्त शैक्षणिक क्रांतीची तातडीने गरज आहे. मात्र ही क्रांती केवळ साक्षरतेपुरती मर्यादित न राहता, रोजगारभिमुख, कौशल्य-आधारित आणि संशोधन-केंद्रित असली पाहिजे. यासाठी आपल्याला प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च शिक्षणापर्यंतच्या पायाभूत सुविधांचे आधुनिकीकरण करावे लागेल, जेणेकरून भारतातील तरुण जागतिक स्तरावर नेतृत्व करू शकतील. तात्पर्य इतिहासाच्या साक्षीपुराव्यात विकसित प्रगत राष्ट्राची निर्मिती ही ज्या देशांनी दशकांपूर्वीच शिक्षणाला प्राधान्य दिले, तेच देश प्रगती करू शकले म्हणून जर आपल्याही भारत देशाला एक विकसित देश बनवायचे असेल, तर एका सशक्त शैक्षणिक क्रांतीची गरज का नसावी ?

जपानमध्ये मेइजी पुनर्संचयनानंतर शिक्षणाचे आधुनिकीकरण करण्यात आले. त्याची कायदेशीर अंमलबजावणी 1872 च्या शिक्षण कायद्यान्वये प्राथमिक शिक्षण अनिवार्य करण्याचा प्रयत्न झाला, परंतु प्रत्यक्ष सक्तीची अंमलबजावणी 1880 च्या दशकात आणि विशेषतः 1890 च्या दशकात अधिक कडक झाली. मोफत शिक्षण 1900 मध्ये प्राथमिक शिक्षण मोफत आणि सक्तीचे करण्यात आले त्याचा कालावधी, सुरुवातीला सक्तीचे शिक्षण 4 वर्षांचे होते, जे 1907 मध्ये वाढवून 6 वर्षे करण्यात आले. थोडक्यात, 19 व्या शतकाच्या उत्तरार्धात (सुमारे 1880-1890 च्या काळात) जपानमध्ये सक्तीच्या शिक्षणाचा पाया रचला गेला. जर्मनीमध्ये शिक्षण सक्तीचा कायदा सर्वप्रथम 18 व्या शतकात (1717), विशेषतः प्रशिया साम्राज्यात लागू करण्यात आला. मुला-मुलींसाठी सक्तीच्या शिक्षणाची पहिली पायरी 1592 मध्ये दक्षिण-पश्चिमेकडील डची, फ्लझ-ज्वेब्रुकेन येथे सुरू झाली. प्रशियाचा पहिला कायदा (1717) प्रशियाचे राजे फ्रेडरिक द ग्रेट यांनी 1717 मध्ये सक्तीच्या शिक्षणाचा कायदा केला, ज्यानुसार मुलांना किमान काही वर्षे शाळेत जाणे अनिवार्य होते. त्याची व्यापक अंमलबजावणी 1763 मध्ये सुरू झाली,ज्यानुसार 8 वर्षांसाठी शाळा अनिवार्य करण्यात आली. संपूर्ण जर्मनीमध्ये 8 वर्षांच्या शिक्षणाचा नियम 1835 पर्यंत स्थिरावला. देशव्यापी कायदेशीर मान्यता (1919) मधे संविधानाने संपूर्ण देशात सक्तीचे शिक्षण कायद्यात प्रस्थापित झाले.

विकसित अमेरिकेत पहिला सक्तीचा शिक्षण कायदा 1852 मध्ये मॅसॅच्युसेट्स राज्यात मंजूर करण्यात आला. या कायद्यानुसार 8 ते 14 वयोगटातील मुला-मुलींना वर्षातून किमान तीन महिने शाळेत जाणे सक्तीचे करण्यात आले, ज्यापैकी 6 आठवडे सतत उपस्थिती अनिवार्य होती. कामाच्या ठिकाणी मुलांचा वापर कमी करणे आणि त्यांना साक्षर करणे हा यामागील मुख्य उद्देश होता. यानंतर इतर अमेरिकन राज्यांनीही असे कायदे केले आणि 1918 पर्यंत अमेरिकेच्या सर्व राज्यांमध्ये सक्तीच्या शिक्षणाचा कायदा लागू झाला. तात्पर्य काय तर, विकसित राष्ट्र निर्माण हे शिक्षणाच्या सशक्त क्रांतीने होते. केवळ राजकीय किंवा औद्योगिक क्रांतीने नाही. नेपाळ आणि चीनही शिक्षणाबाबत सध्या नव्याने कृतीशील धोरण जाहीर करताना दिसतात. भारतातील शैक्षणिक क्रांती ही सध्या एक निरंतर चालणारी प्रक्रिया असली तरी 2020 चे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण या क्रांतीचा कणा बनवणे गरजेचे आहे. या धोरणांतर्गत अडचणी, हरकतींवर आणखीन सकारात्मक विचार करून बदल करता येण्यासारखा आहे. शिक्षणात नैसर्गिक समतोल, साधन संपत्ती, वैज्ञानिक दृष्टिकोन, जागतिक भूभोल, संसाधने आणि मानवीय कल्याणाची वैश्विक उपयोगिता आणि दर्जा नव्याने प्रस्थापित व्हायला हवा. पारंपारिक शिक्षण प्रणालीत बदल, तसेच केवळ परीक्षेसाठी शिकण्याऐवजी, विद्यार्थ्यांमध्ये गंभीर विचार आणि समस्या निवारण कौशल्ये विकसित करण्यावर भर दिला जावा. डिजिटल इंडिया मोहिमेअंतर्गत, ग्रामीण भागापर्यंत इंटरनेट आणि ऑनलाइन शिक्षण पोहचवणे, प्रयोग करून शिकणे, या पद्धतीवर भर देणे, ज्यामुळे विद्यार्थी व्यावहारिक ज्ञान प्राप्त करू शकतील तसेच शाळा आणि महाविद्यालयांमध्ये उद्योजकतेचे शिक्षण दिले जात आहे, जेणेकरून विद्यार्थी नोकरी मागणारे न बनता नोकरी देणारे बनतील. म्हणून केवळ नोकरदार, कामगार व कारकून घडवर्णाया शिक्षण पद्धतीकडून आता शिक्षणाचा दर्जा वाढवून व्यापक प्रवास सुरू होणं गरजेचं आहे. थोडक्यात, आपणही आता पाठांतर-आधारित शिक्षणाकडून प्रज्ञा-आधारित आणि कौशल्य-आधारित शिक्षणाकडे वेगाने वाटचाल करायला हवी, जेणेकरून अशी शैक्षणिक क्रांती भारताला ज्ञान-महाशक्तीबनवण्यासाठी महत्वाची ठरेल.

भारतीय शिक्षणव्यवस्थेचा नवीन अध्याय सुरू होत असताना भारतातील वैविध्यामुळे नवनवीन समस्या व आव्हाने समोर उभी राहिली तरीही राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांचा अभ्यास आणि भारतातील शिक्षण क्षेत्रातील क्रांतीची गरज लक्षात घेता, वास्तविक-जीवन आणि जगातील शिक्षण अभ्यासक्रमात अंतर्भूत व्हायला हवे. ही जबाबदारी व्यवस्थेबरोबरच शिक्षकांच्या खांद्यांवर आहे हे विसरून चालणार नाही. त्यामुळे त्यांच्या समस्या जाणून घेतल्या पाहिजेत. सशक्त शिक्षण क्रांतीच्या दिशेने हेही विसरता कामा नये की, शिक्षण समग्र, संवेदनशील, वैचारिक, निर्मिक, वास्तविक, वैज्ञानिक, तांत्रिक, निर्भीड व सुसंस्कृतपणा जपणारे हवे. कारण आईसाहेब जिजाऊंकडून शिवबांनी घेतलेले ज्ञानाचे धडे स्वराज्य निर्माण करणारे ठरले. सावित्रीबाई आणि ज्योतिबा फुले यांच्या शिक्षण क्रांतीमुळे महिलांना शिक्षणाची सोय झाली.

डॉ. बाबासाहेबांमुळे शिक्षणचा हक्क दलितांना आणि सर्वांनाच मिळाला. दिव्यांगांनाही शिक्षण कसे घेता येईल हा विचार तशी व्यवस्था करण्यात आली तर समग्र घटकांना शिक्षण मिळेलच, परंतु त्यांच्यातील ज्ञानाला, गुणांना चालना मिळेल जी एका सशक्त राष्ट्राची निर्मिती करण्यास महत्वाची ठरेल. तात्पर्य, सशक्त शिक्षणात मूल्यांची जपणूक-जोपासणा व्हावी, दिलं जाणार शिक्षण समग्र असावं. कुणाही अटीशर्तींवर वंचित राहू नयेत, प्रत्येकाच्या लोक उपयोगी कला गुणांना वाव मिळाला पाहिजे, त्याची ब्रँडिंग, जाहिरात त्याच ठिकाणावरून व्हायला हवी, तसे कायदे नियम हवे.

शिक्षणात वास्तविक जगातील आणि जीवनातील समस्या तत्परतेने कायम सोडवणारे ज्ञान कौशल्य मिळेल अशी व्यवस्था आणि पद्धत अंगीकारायला हवी. असे झाल्यास देशाला ज्ञान महाशक्ती बनण्यास वेळ लागणार नाही.

रवा इडली

साहित्य: रवा २ वाट्या (उपम्यासाठी वापरतो तो गव्हाचा मध्यम जाडसर रवा), उडीद डाळ १ वाटी, तेल १ छोटा चमचा, मिठ चवीप्रमाणे, खायचा सोडा ऐच्छिक (गरज वाटलीच तर).

कृती: २ वाट्या रवा (उपम्यासाठी वापरतो तो जाडसर रवा) बंद डब्यात ठेवून कूकरमध्ये कोरडाच वाफवून घ्यायचा. १ वाटी उडीद डाळ साधारण चार तास भिजवून वाटून घ्यायची. पाणी फार वापरायचे नाही. रवा थोडा थंड झाल्यावर पाण्याने धुऊन वाटलेल्या डाळीत मिक्स करायचा. रवा वाफवून नंतर धुऊन घेतल्याने हलका होतो. चवीपुरते मीठ घालून बॅटर रात्रभर (किंवा सहा सात तास) ठेवून द्यायचे. मस्त पीठ फुगते. इडल्या करण्याआधी एक चमचा तेल आणि एक चमचा पाणी मिक्स करून ते त्या बॅटरमध्ये घालून इडल्या बनवायच्या. मस्त स्पॉन्जी जाळीदार इडल्या होतात.



इडलीचे पीठ चांगले येण्यासाठी...

- उडीद डाळ वाटताना जास्त पाणी वापरायचे नाही.
- पण डाळ भिजवलेले पाणी फेकून न देता रवा मिक्स करून बॅटर तयार करताना वापरायचे. म्हणजे पीठ छान येते (फुगते/ आंबते). पीठ पळीवाढे असावे. म्हणजे सहा-सात तासांनी चांगले फुगते.
- वाटीभर भात (उरलाच असेल आणि संपवायचा असेल तर) वाटून या पिठात मिक्स केला तरी चालतो.
- काही वेळा थंडीमुळे पीठ आले नाही किंवा इडल्या लवकर बनवायच्या असतील तर चिमूटभर सोडा, चमचाभर पाणी आणि चमचाभर तेल मिक्स करून पिठात घालायचे.
- ज्यांना तांदूळ चालत नाही त्यांच्यासाठी हा चांगला पर्याय आहे.

लिपस्टिक वापरताय... जरा काळजी घ्या

बाजारात उपलब्ध असलेल्या विविध प्रकारच्या लिपस्टिकमध्ये शिसासारखे विषारी धातूचे प्रमाण चिंताजनक असल्याचे प्रयोगशाळेत करण्यात आलेल्या तपासणीतून उघडकीस आले आहे. यात २२ नामवंत लिपस्टिक ब्रँडचाही समावेश आहे.

बोस्टन लेड पॉयझनिंग प्रिव्हेन्शन प्रोग्रॅमच्या खाली या तपासण्या केल्या गेल्या. संस्थेचे वैद्यकीय संचालक डॉ. सीन पालफ्रे याविषयी माहिती देताना म्हणाले की, लिपस्टिकसारखी सौंदर्यप्रसाधने वापरताना ती पूर्ण सुरक्षित हवीत यात संशय नाही. लिपस्टिक लावलेल्या ओठावरून अनेक वेळा जीभ फिरविली जाते, त्यामुळे अंश पोटात जात असतो. यात वापरण्यात येणाऱ्यात शिशाची पातळी धोकादायक असून त्यामुळे मानसिक आरोग्याला धोका निर्माण होतो. याचा थेट परिणाम बुद्धी आणि स्मरणशक्तीवर होतो. परिणामी बुद्ध्यांक कमी होतो आणि तरुण वयातील मुलींमध्ये शिकण्याची क्षमताही घटू शकते. गरोदर महिलांनी असल्या लिपस्टिक वापरल्या तर त्याचा परिणाम गर्भातील बाळावर होतो.

शिसे हा विषारी धातू आहे, मात्र त्याचे लिपस्टिकमधील प्रमाण किती असावे यावर अन्न व औषध विभागाचेच नियंत्रण नाही, तर हे नियंत्रण संबंधित कंपन्यांवरच आहे. त्यामुळे किती प्रमाणात शिसे वापरले जाते हे त्या उत्पादकांवर अवलंबून असते. शिशाचे प्रमाण जाणूनबुजून वाढवले जात नसले तरी ज्या खनिजांपासून लिपस्टिकचे विविध रंग तयार होतात त्यात शिसे असतेच. आज लिपस्टिकच्या ४०० लोकप्रिय शेड्स बाजारात आहेत. लोरियाल, मेबेलिन, कव्हर गर्ल्स, नार्स, स्ट्रगेझर या नामवंत कंपन्या पहिल्या दहा नंबरच्या उत्पादकात आहेत, मात्र त्यांच्याही लिपस्टिकमध्ये शिसे धोकादायक पातळीत आहे, असेही पालफ्रे यांना तपासणीत आढळून आले आहे.



उन्हाळ्यात रोज रात्री अंघोळ केल्याने होतील हे ४ फायदे

बाहेरील तापमान वाढल्यानंतर याचा परिणाम शरीरावर देखील होत आहे. सूर्य दिवसागणिक आग ओकतच चालला आहे. उन्हाचा कहर वाढत चालल्याने स्वास्थ्यावर परिणाम होत चालला आहे. सकाळी अंघोळ करून आपण घरातून निघालो की तेव्हापासून घामाच्या धारा यायला सुरुवात होते. घामामुळे त्वचा ओलसर होऊन धूळ आणि माती शरीराला चिकटू लागते. यामुळे शरीरावर घाम आणि मळ जमा होतो. तसेच अति घामामुळे शरीराला दुर्गंधी येऊ लागते. या साऱ्यातून वाचण्यासाठी काही लोक घरी जाऊन अंघोळ करतात तर काही हात-पाय धुऊन कपडे बदलतात. दिवसाच्या सुरुवातीला तर सर्वच अंघोळ करतात, पण तुम्ही जर रात्रीही अंघोळ करत असाल तर त्वचेसंदर्भातील आजारापासून दूर राहू शकाल. गरमीमध्ये जर तुम्ही रात्री अंघोळ नाही केली तर त्वचेसंदर्भात अनेक आजार तुम्ही ओढवून घेऊ शकता. रात्री घरी आल्यानंतर तुम्ही अंघोळ करत असाल तर तुमचा दिवसभराचा थकवा दूर झाला असेल. आणि मनाने तुम्ही असाल. तुम्हाला शांत झोप येऊ शकेल. याचे काय काय फायदे आहेत याबद्दल जाणून घेऊया...



तन फ्रेश

हृदय स्वास्थ्य : रात्रीच्या वेळी रक्ताचा प्रवास शांत गतीने होत असतो. अशावेळी तुम्ही स्वच्छ पाण्याने स्नान कराल तर रक्त प्रवाह खूप चांगला होईल. हृदयावरही याचा सकारात्मक परिणाम होतो. जर तुम्हाला तुमच्या हृदयाचे स्वास्थ्य हवे असेल तर तुम्हाला रात्रीच्या अंघोळीची सवय लावायला हवी.

फ्रेश वाटेल : गरमीच्या दिवसात ऊन, धूळ आणि घामामुळे शरीरावर मळ जमा होतो. रात्रीच्या अंघोळीने शरीर स्वच्छ होते. अंघोळीनंतर तुम्ही फ्रेश आणि ताजेतवाने होता. यामुळे तुमची त्वचा देखील चमकत राहील.

शांत झोप येईल : गरमीमुळे तणाव आणि शरीर दमल्यासारखे होते. अशावेळी रात्रीच्या अंघोळीने शरीराचा तणाव कुठच्या कुठे जाईल आणि अंथरुणात पडल्या पडल्या तुम्हाला झोप येईल.

जर बाळाला बाटलीतून
दूध देत असाल तर सावधान...

जर तुम्ही तुमच्या बाळाला बाटलीमधून दूध देत असाल तर सावधान... बाटलीमधील दूध तुमच्या बाळाच्या आरोग्यासाठी फार घातक ठरण्याची शक्यता आहे. लहान मुलांना दूध पाजण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या दूधाच्या बाटलीमध्ये मोठ्या प्रमाणात घातक रसायनांचा समावेश करण्यात येतो. एका संशोधनातून ही बाब समोर आली आहे. डॉक्टरही दूध पाजण्यासाठी दुधाची बाटली न वापरण्याचा सल्ला देतात.


दुधाची बाटली आणि सिपरमध्ये घातक रसायन असल्याचे संशोधनातून साध्य झाले आहे. हे रसायन मुलाच्या आरोग्यस घातक आहे. 'बिस्फेनॉल-ए' नावाच्या रसायनाचा समावेश दुधाची बाटली आणि सिपरमध्ये असतो.

केलेल्या संशोधनात १४ दुधाच्या बाटल्या आणि ६ सिपरचे नमुने घेण्यात आले होते. हे नमुने दिल्ली व्यतिरिक्त गुजरात, राजस्थान, केरळ, आंध्र प्रदेश, झारखंड, महाराष्ट्र, मणिपूरमधून घेण्यात आले होते. घेण्यात आलेल्या नमुन्यांचे निरीक्षण इंडियन इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी, गुवाहाटीमध्ये करण्यात आले. ज्यामध्ये हे स्पष्ट झाले की, बाटलीतील रसायने मुलांच्या शरीरात पोहोचत आहेत.

डॉक्टर तपीशा गुप्ता यांनी दिलेल्या माहितीनुसार, बाटलीमधून मुलांना सतत दूध दिल्यास त्यांच्या गळ्याला सूज आणि उलटी होण्याची शक्यता आहे. डायरिया सुद्धा होऊ शकतो. म्हणून नेहमीच मेडिकेटेड बाटली वापरा. वैद्यकीय स्टोअरमध्ये चांगल्या दर्जाच्या दुधाच्या बाटल्या उपलब्ध आहेत. पॉली कार्बोनेटच्या मदतीने तयार करण्यात आलेल्या बेबी बॉटलवर बीआयएसने बंदी घातली होती. २०१५ साली बेबी बॉटलवर बंदी घातली होती. त्यानंतरही या बाटल्या मार्केटमध्ये सर्रास विक्रीसाठी उपलब्ध आहेत. लहान मुलांच्या आजारांसाठी मुख्य कारण दुधाच्या बाटल्या आहेत.



अनेक वेळा अनेक जणांना स्मार्टफोनचा वापर करताना स्टोअरेज फुल होत असल्याची समस्या वारंवार येत असते. तुमच्या फोनचे स्टोअरेज कमी झाले असेल तसेच तुम्हाला वारंवार तुम्हाला नोटिफिकेशन येत असेल तर तुमचा फोन हाय स्पीडने काम करू शकत नाही. आज आम्ही तुम्हाला अशाच काही खास टिप्स आणि ट्रिक्ससंबंधी माहिती देत आहोत. या ट्रिक्सचा वापर केल्यास तुम्हाला नक्कीच फायदा मिळू शकतो.



फोनचे स्टोअरेज वारंवार फुल होतेय?

एका झटक्यात समस्या सोडवा, पाहा टिप्स अँड ट्रिक्स

क्लीअर करा ॲप कॅशे

तुमच्या फोनमध्ये अनेक कॅशे फाइल्स स्टोअर होत असतात. फोनचे स्टोअरेज भरण्यासाठी हे सुद्धा एक महत्त्वाचे कारण आहे. तुमच्या मोबाईलमध्ये अनेक ॲप ओपन करत असतात. तुमच्या फोनमध्ये ॲपचे कॅशे फाइल्स जमा होत असतात. त्यामुळे तुम्हाला सल्ला आहे की, वेळोवेळी फोनमधून कॅशे फाइल्सला क्लीअर करत राहायला हवे. असे केल्याने फोनची स्टोअरेज रिकामे राहते. तसेच फोन सुद्धा स्लो होत नाही.

क्लाऊड स्टोअरेजचा वापर करा

जर तुमच्या फोनचे स्टोअरेज वारंवार फुल होत असेल तर यासाठी सर्वात खास ऑप्शन म्हणजे फोनमधील फोटो आणि व्हिडीओ फाइल्सला क्लाऊड स्टोअरेजवर ट्रान्सफर करा. याचा एक फायदा होईल. तो म्हणजे नंतर तुम्ही या फोटो किंवा व्हिडीओला कुठूनही ॲक्सेस करू शकाल. मग तुमच्या जवळ फोन असो की नाही. तसेच दुसरा फायदा म्हणजे स्टोअरेज फुल होण्याची भीती नाही.

स्मार्टफोनमधून हटवा अनावश्यक ॲप्स

तुमच्या फोनमध्ये जर अनावश्यक ॲप्स असतील तर ते फोनमध्ये ठेवण्यात काहीच अर्थ राहत नाही. ते डिलीट किंवा काढून टाकणे गरजेचे आहे. या ॲप्समुळे स्टोअरेज नेहमी फुल होत असते. त्यामुळे सर्वात आधी चेक करा की, तुमच्या फोनमध्ये अनावश्यक ॲप्स किती आहेत. नंतर त्यांना अनइन्स्टॉल करा.

बनाना / ॲपल पॅनकेक

साहित्य : २ केळी किंवा १ सफरचंद, १ वाटी कणीक, २ वाट्या तांदळाची पिठी, १ अंडं, अर्धी वाटी बारीक चिरलेला गूळ/ साखर/ पिठीसाखर, अर्धी वाटी सुकामेवा (बदाम, अक्रोड, अंजीर इत्यादी), भाजण्यासाठी तूप.

कृती : कणीक आणि तांदळाची पिठी एकत्र करून घ्या. अंडं एका वाटीत फोडून फेटून घ्या. सुकामेवा बारीक चिरून घ्या. अगदी लहान मुलं (दीड-दोन वर्षांची) खाणार असतील तर सरळ किसून घ्या. कणीक आणि तांदळाच्या पिठीत फेटलेलं अंडं, चिरलेला सुकामेवा, गुळ/ साखर यापैकी जे वापरत असाल ते घालून थोडं पाणी घालून हाताने गुठळ्या मोडून ओलसर भिजवा. पातळ अजिबात करू नका. केळं मॅश करा. सफरचंद किसा आणि वरच्या मिश्रणात घाला. आता हळूहळू पाणी घालत घालत नीट ढवळत मिश्रण थोडं सैल करा. साधारणपणे आपण केकचं बॅटर करतो तेवढं सैल मिश्रण पुरे. डावेने सहज तव्यावर घालता आलं पाहिजे. तवा/ फ्रायपॅन तापवून घ्या. थोडं तूप घाला आणि त्यावर लहान लहान पॅनकेक घाला. तव्याच्या आकाराप्रमाणे २/३/४ एकावेळी होतील. झाकण ठेवा. एका बाजूने झाले की उलटा. खरपूस भाजून घ्या.



टिप :
- अंडं घालायचं नसेल तर बहुतेक बेकिंग पावडर किंवा सोडा घालावा लागेल हलके होण्यासाठी. अंडं घातलं की पोषणमूल्य वाढतंच, पण शिवाय अजून एक फायदा हा की नॉनस्टिक नसेल तरीही तव्यावरून सहज सुटतात.
- गुळ/ साखर काहीच नको असेल तर खजूर सिरप मिळतं ते घातलं तरी चालेल.
- फळं ऐनवेळीच मॅश करा. नाहीतर काळी पडतील. बाकी तयारी आधी करून ठेवता येईल.

पांढऱ्या केसांच्या समस्येवर करा घरगुती उपाय

बाजारातील केमिकलयुक्त रंगांमुळे केस काही वेळासाठी काळे होतात, केसांना रंग चढतो, परंतु कालांतराने पुन्हा केस जैसे थे होतात. केमिकलमुळे केसांवर घातक परिणाम होतात. केस अधिक पांढरे होतात, गळतात. केमिकलयुक्त रंगाचा शरीरावरही वाईट परिणाम होत असतो. डोळ्यांची जळजळ, केसात, त्वचेवर खाज येणं, इन्फेक्शन होणं अशा समस्यांमुळे केसांच आरोग्य सुधारण्याऐवजी केस आणि शरीर दोघाचं आरोग्य बिघडवत असतो.

अकाली केस पांढरे, सफेद होणं अगदी सामान्य बाब असली तरी चिंतेचा विषय झाला आहे. लहान मुलांमध्येही केस पांढरे होण्याचं प्रमाण मोठ्या पटीने वाढलं आहे. केस पांढरे होण्यामागे अनेक कारणं आहेत. आनुवांशिकता, धूळ, प्रदूषण, खाण्यापिण्यात झालेले बदल, अधिक ताण, केसांची काळजी न घेतली गेल्याने केसांचं गळणं, पांढरं होणं अशा समस्या निर्माण झाल्या आहेत. केस पांढरे होण्यावर बाजारात अनेक पर्याय उपलब्ध आहेत. परंतु बाजारातील या पर्यायांमधून फायद्यांऐवजी नुकसान होण्याचाच मोठा धोका असतो. बाजारातील केमिकलयुक्त रंगांमुळे केस काही वेळासाठी काळे होतात, केसांना रंग चढतो, परंतु कालांतराने पुन्हा केस जैसे थे होतात.



केमिकलमुळे केसांवर घातक परिणाम होतात. केस अधिक पांढरे होतात, गळतात. केमिकलयुक्त रंगाचा शरीरावरही वाईट परिणाम होत असतो. डोळ्यांची जळजळ, केसात, त्वचेवर खाज येणं, इन्फेक्शन होणं अशा समस्यांमुळे केसांचे आरोग्य सुधारण्याऐवजी केस आणि शरीर दोघाचं आरोग्य बिघडवत असतो. त्यामुळे केसांच्या पांढऱ्या होणाऱ्या समस्येवर काही घरगुती, आयुर्वेदिक तसंच नैसर्गिक उपायांनी केस काळे करण्याचा प्रयत्न केला जाऊ शकतो. कालांतराने या नैसर्गिक उपायांचा फायदा दिसू लागतो.



आवळा : काही सुकवलेले आवळे नारळ्याच्या तेलात चांगले उकळवा. त्यानंतर हे तेल काचेच्या बाटलीत भरून ठेवा. कमीत कमी एक तास किंवा रात्री झोपताना तेल लावून केसांच्या मुळांमध्ये मसाज करा. आठवड्यातून २ ते ३ वेळा तेलाचा वापर करा. सतत तीन महिने हा प्रयोग केल्याने चांगला फायदा होतो. आवळ्यासोबत नारळाच्या तेलाऐवजी बदाम तेलाचाही वापर करा. तेल उकळवताना कमी तापमानावर उकळवा. अधिक तापमानात उकळवताना तेलातील पोषक द्रव्ये नष्ट होतात.



कडीपत्ता : केस धुण्यात साध्या किंवा अगदी कोमट पाण्यात कडीपत्त्यांची पानं एक तास आधी टाकून ठेवा. त्याच पाण्याने केस धुवा. आवळ्याप्रमाणे कडीपत्त्यांची पानंही तेलात उकळवून ते तेल लावू शकता. कडीपत्त्यांच्या पानांची पेस्टही केसांना लावू शकता.

लिंबू : नारळाच्या तेलात लिंबू पिळून ते लावल्यानेही फायदा होतो. हे मिश्रण पुरुष दाढीलाही लावू शकतात. आठवड्यातून दोन वेळा याचा उपयोग करा.

ब्लॅक टी आणि मेहंदी : चहा पावडर पाण्यात उकळून थंड करून केसांना लावल्याने चांगला रंग येतो. चहाऐवजी ब्लॅक कॉफीचाही उपयोग करता येतो. आठवड्यातून ३ वेळा हा प्रयोग करा. मेहंदी भिजवताना त्यात चहाचं उकळलेलं पाणी टाका. याशिवाय मेहंदीत आवळ्याचा रस, लिंबू रस किंवा दही, शिकेकाई पावडर, मेथी दाण्यांची पावडर टाकून मेहंदी लावा याने नैसर्गिक रंग येतो.

कांदा : कांद्याचा रस किंवा पेस्ट आठवड्यातून २ ते ३ वेळा लावल्याने चांगला फायदा होतो. केस धुण्याआधी हा उपाय सतत केल्याने कालांतराने केस नैसर्गिकरीत्या काळे होण्यास सुरुवात होते.

तूप : गायीचं तूप केसांच्या मुळाशी लावून मसाज केल्याने पांढऱ्या केसांची समस्या कालांतराने नष्ट होण्यास मदत होते.

व्हॉट्सॲपचे महिलांसाठी खास फिचर

व्हॉट्सॲप हे ४०० दशलक्ष वापरकर्ता बेस असलेले सर्वात जास्त वापरले जाणारे सोशल मीडिया प्लॅटफॉर्म आहे. मागील वर्षांमध्ये व्हॉट्सॲपने वापरकर्त्यासाठी अनेक रोमांचक वैशिष्ट्ये सादर केली आहेत. महिलांसाठी व्हॉट्सॲप प्रायव्हसीशी संबंधित काही टिप्स जाणून घ्या, ज्याचा वापर करून तुम्ही तुमचे मेसेज पूर्वीपेक्षा अधिक सुरक्षित करू शकता.

अज्ञात क्रमांक कसे ब्लॉक करावे आणि तक्रार कशी करावी

व्हॉट्सॲप हे चॅटिंगसाठी खासगी आणि सुरक्षित ॲप आहे. तथापि बऱ्याच वेळा जेव्हा वापरकर्त्याला अनोळखी नंबरवरून संदेश आणि कॉल येतात, तेव्हा व्हॉट्सॲप वापरकर्त्याला तो नंबर 'ब्लॉक आणि रिपोर्ट' करण्याचा एक सोपा पर्याय देतो. जर तुम्हाला एखाद्याच्या मेसेज किंवा कॉलचा जास्त त्रास होत असेल तर तुम्ही त्याचा नंबर ब्लॉक करून तक्रार करू शकता.

संदेशाच्या गोपनीयतेवर अधिक नियंत्रण ठेवा

व्हॉट्सॲपच्या एंड-टू-एंड एन्क्रिप्शनसह तुमचे संदेश, फोटो, व्हिडीओ, व्हॉइस संदेश, दस्तऐवज, स्थिती अद्यतने आणि कॉल सुरक्षित राहतात. जर वापरकर्त्यांना त्यांच्या चॅट्स अधिक सुरक्षित करायच्या असतील, तर यासाठी आणखी अनेक वैशिष्ट्ये देण्यात आली आहेत, जसे की अदृश्य संदेश, जे तुम्ही निवडलेल्या वेळेनुसार २४ तास, ७ किंवा ९० दिवसांत पाठवलेले संदेश आपोआप हटवतात. व्ह्यू वन्स फीचर वापरून तुम्ही कोणत्याही युजरला फोटो आणि व्हिडीओ पाठवू शकता. वापरकर्ते त्यांची गोपनीयता वाढवण्यासाठी दृश्य वन्स वैशिष्ट्यासाठी स्क्रीनशॉट ब्लॉकिंग वैशिष्ट्य सक्षम करू शकतात.



या ग्रुप गोपनीयता सेटिंग्ज सक्षम केल्याची खात्री करा

व्हॉट्सॲपची गोपनीयता सेटिंग्ज आणि ग्रुप आमंत्रणे वापरकर्त्यांना ग्रुपमध्ये कोण जोडू शकते हे ठरवू देते. तुम्हाला माहिती न देता व्हॉट्सॲप ग्रुपमध्ये ॲड केले असल्यास, तुम्ही कोणाच्याही नकळत तो ग्रुप गुप्तपणे सोडू शकता.

तुमच्या ऑनलाइन माहितीवर नेहमी नियंत्रण ठेवा

व्हॉट्सॲपवर, वापरकर्ते त्यांची वैयक्तिक माहिती नियंत्रित करू शकतात, जसे की प्रोफाइल फोटो, शेवटचा पाहिलेला, ऑनलाइन स्थिती, आमच्याबद्दल, स्थिती. तुमचा प्रोफाईल चित्र आणि तुमची ऑनलाइन स्थिती कोण पाहू शकते याची गोपनीयतादेखील तुम्ही निवडू शकता.

तुमचे खाते अशा प्रकारे सुरक्षित करा

व्हॉट्सॲप वापरकर्त्याला टू-स्टेप व्हेरिफिकेशन फीचर देखील प्रदान करते, ज्याच्या मदतीने तुम्ही तुमचे खाते अधिक सुरक्षित करू शकता. प्रत्येक वेळी तुम्ही दुसऱ्या डिव्हाइसवर लॉग इन करताना तुम्हाला सहा-अंकी पिन आवश्यक असेल. सीम कार्ड चोरीला गेल्यास किंवा फोनमध्ये छेडछाड झाल्यास हे खूप उपयुक्त आहे.

काकडी उन्हाळ्यात ठेवेल कूल, जाणून घ्या याचे फायदे

काकडी ही उन्हाळ्यात जास्त प्रमाणात दिसून येते. काकडी थंड असल्याने तहान भागवली जाते. अंगाची आग होत असेल तर नुसती काकडी चिरून त्यात साखर घालून खावी. आग थांबते. लघवी साफ होत नसेल उन्हाळी लागली असेल. लघवी वारंवार व थोडी थोडी होते असेल तर काकडी चिरून साखरेबरोबर खावी म्हणजे लघवी साफ होते. काकडीचे बी अंगातील कडकी कमी होण्यासाठी देतात. पुष्कळ दिवस एकसारखा येणारा ताप काकडीच्या बियांच्या काट्याने निघतो.

गुणधर्म : काकडी मधुर, शीतल, पाचक, मूत्रगामी आणि अग्निदीपक तसेच पित्तहारक व थंड आहे. सर्व प्रकारचे मूत्रविकार नाहीसे करते. शरीरातील आग व चक्कर येणे नाहीसे करते.

उपयोग : काकडीचा रस बियांसह गुणकारी आहे. रिकाम्या पोटी एक ग्लास रस घेतल्यास जास्त उपयोगी होतो. काकडीचा उष्मांक (कॅलरीज) कमी असतो. त्यामुळे स्थूलतेवर उपयोग होतो.

फायदे : काकडीचा संधीवात, मूत्रविकार, मधुमेह यासाठी काकडी चांगली, अंगातील आग कमी व्हावी, म्हणून काकडी घेत असल्यास आंबट-गोड फळे व तेलयुक्त पदार्थ त्या प्रयोगात खाऊ नये. प्रयोग दोन महिने करावा. त्याने शरीरावरील गळवे, पुळ्या कमी होतात.



पंतप्रधान मोदींनी जे सांगितलंय 'ते' पाळावे; मुख्यमंत्री फडणवीसांचे जनतेला आवाहन, युद्धपरिस्थितीवर भाष्य

■नागपूर। प्रतिनिधी,
आखाती देशातील युद्धजन्य परिस्थितीच्या झळा आजही देशवासीयांना बसत असल्याचं दिसून येत आहे. राज्यात एकीकडे पेट्रोल आणि डिझेलची कमतरता जाणवत असून अद्यापही घरगुती गॅससाठी सर्वसामान्यांना रांगेत उभे राहावे लागत आहे. सध्या आखाती देश, अमेरिका आणि इराण यांच्यात शस्त्रसंधी करण्यात आली असली तरीही गतकाळातील आणि भविष्यातील परिस्थितीमुळे देशवासीयांना काही बंधने घालून पुढे जावे लागेल. यासंदर्भात पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आज देशवासीयांना काही महत्त्वाची आवाहनं केली आहेत. त्यामध्ये, वर्षभर सोनं खरेदी करू नका, पेट्रोल-डिझेलचा वापर जपून करा, असे आवाहन पंतप्रधानांनी केलंय. तर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही मोदींचे आवाहन योग्य असल्याचं म्हटलं.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सांगितलं आहे, ते योग्य आहे. गरजेप्रमाणे तेल आणि गॅसचा वापर वापर करायला हवा, असे म्हणत मोदींच्या आवाहनाला प्रतिसाद देण्याची अपेक्षा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केलीय. जगभरात अमेरिका,इस्त्रायरण-इराण युद्धामुळे तेल आणि गॅसच्या इंधन पुरवठ्यामध्ये तुटवडा निर्माण झाला आहे. आपल्या बाजूच्या देशांमध्ये मोठ्या प्रमाणात किल्लत आहे. पाकिस्तानमध्ये साडेचारशे रुपये प्रति लिटर तेलाचे भाव झाले आहेत. मात्र, आपल्या प्रधानमंत्री यांनी कुठल्याही पद्धतीने पुरवठ्यावर परिणाम होऊ दिला नाही. पण, ही अडचण जर आपण समजली नाही आणि याचा उपयोग योग्य प्रमाणात नाही केला, तर आपल्यालाही अडचणीचा सामना करावा लागेल. त्यामुळे, पंतप्रधानांनी जे आवाहन केलंय, त्यावर सर्व देशवासीयांनी अंमलबजावणी करावी, असे फडणवीसांनी म्हटले.



काय म्हणाले, पंतपधान

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले की, पेट्रोल, गॅस आणि डिझेलचा वापर कमी केला पाहिजे. शेजारील देशांमध्ये सुरू असलेल्या युद्धामुळे जगभरात पेट्रोल आणि डिझेलच्या किमती अनेक पटींनी वाढल्या आहेत. पंतप्रधान हैदराबादमध्ये म्हणाले की, आपल्याकडे मोठ्या तेल विहिरी नसल्यामुळे या जागतिक संकटाचा भारतावर अधिक परिणाम होत आहे. ते म्हणाले की, ज्या शहरांमध्ये मेट्रो आहे, तिथे लोकांनी तिचा वापर करावा. आज आपल्याला बैठकांसाठी व्हिडिओ कॉन्फरन्सिंग आणि वर्क फ्रॉम होमसारख्या उपायांची गरज आहे.

पंतप्रधान मोदींनी केलेली 9 आवाहने
1.पेट्रोल डिझेलचा वापर जपून करा कारण दर खूप वाढले आहेत
2.खाद्यतेलाचा वापर मर्यादित जपून करा
3.पुढील एक वर्ष सोनं खरेदी करू नका
4.वर्षभर परदेशी प्रवास टाळा
5.कच्च तेल वाचवण्यावर भर द्यायचा आहे
6.परकीय चलन वाचवण्यावर भर द्यायचा आहे, परकीय चलन साठा आपल्याला कमी होऊ द्यायचा नाही
7.जास्तीत जास्त मेट्रोने प्रवास करा, इलेक्ट्रिक वाहनाने प्रवास करा
8.वर्क फ्रॉम होम वर भर द्या, ऑनलाईन बैठकांवर भर द्या
9.परकीय उत्पादनांची खरेदी कमी करा

नगरसेवकांना गृहीत धरून काम करू नका; महापौरांनी अधिकाऱ्यांचे टोचले कान

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक


मागील पावणे चार वर्षे नगरसेवक नव्हते म्हणून महापालिका प्रशासनातील अधिकारी जर आता नगरसेवकांना गिनतीत धरत नसतील तर हे चालणार नाही. आणि नगरसेवकांना गृहीत धरून जर ते काम करत असतील ते तर मुळीच चालणार नाही. नवनिर्वाचित नवीन नगरसेवकांना तर अधिकाऱ्यांनी गृहीत धरून काम करूच नये. शेवटी प्रत्येक नगरसेवकाला ४० ते ५० हजार लोकांनी निवडून दिलेले आहे. त्यामुळे प्रत्येक नगरसेवकांचा सन्मान हा अधिकाऱ्यांनी राखलाच पाहिजे असे महापालिका सभागृहात सांगत महापौरांनी प्रशासनाचे कान टोचले.

मुंबई महापालिका सभागृहात शिवसेनेच्या नगरसेविका अपेक्षा खांडेकर यांनी हरकतीच्या मुद्दयाद्वारे आपल्या प्रभागातील नाल्याची सफाईचे काम अद्याप पूर्ण झालेले असून दुसऱ्या प्रभागातील काढलेला गाळ आपल्या प्रभागात आणून टाकला जात असल्याची बाब सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली. याबाबत अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतरही ते कंत्राटदाराला सांगून हा गाळ उचलण्याची कोणतीही कार्यवाही करत नसून ८० टक्के झोपडपट्टी परिसरत असलेल्या माज्या या प्रभागात मी जर नालेसफाईच्या कामांसाठी प्रयत्न करत राहू तर इतर कामे करणार कधी असा संतप्त सवाल केला.



याला शिवसेनेच्या नगरसेविका निर्मिती कानडे यांनी पाठिंबा देताना आपल्या प्रभागात नाल्यातील गाळ काढून ठेवला आहे पण तो ६ ते ७ दिवस झाले तरी उचलत नाही. तसेच यापूर्वी काढलेला गाळ तिथेच असून त्यावर आता आणखी नवीन गाळ जमा केला आहे. पण जुना गाळ आपण नेणार नाही असेही सांगत आहेत. आम्ही नविन नगरसेवक असल्यामुळे अधिकारी ही उडवाउडवीची उत्तरे देत असून आमदार पराग शाह यांनी घेतलेल्या बैठकीत मी हा मुद्दा मांडण्याचा प्रयत्न केला तो कुठल्याही समितीच्या बैठकीमध्ये नगरसेवकाने जर विभागातील मुद्दा उपस्थित केला तर काही तासांमध्ये तो मुद्दा जाणून घेण्यासाठी अधिकाऱ्यांचे फोन जायला आणि त्या मुद्दयाचे निरसन व्हायला पाहिजे असे सांगितले. पाठिंबा देताना भाजपचे प्रकाश दरेकर यांनी मुंबईच्या प्रवेशद्वाराजवळ कचऱ्याचे साम्राज्य पसरले असून महापालिकेचे तिथे लक्ष नाही. पावसाळा कधीही येईल. उपायुक्तांनी हात दाखवून तुम्ही थांबा असे निर्देश करत मला बोलू दिले नाही असे सांगितले. त्यामुळे आम्ही कामे करायची नाही का असा सवाल केला. यावर सभागृहनेते गणेश खणकर यांनी सभागृहात असो पण आपली ही कामे कागदावर नको तर प्रत्यक्षात दिसली पाहिजे असा इशारा दिला. तर सध्या नव्याने बनवलेल्या रस्त्यांलगतच्या पर्जन्य जलवाहिन्यांमध्ये सिमेंट अडकलेले असून या पर्जन्य जलवाहिनी कशा साफ करणार असा सवाल उपस्थित केला तर स्वप्ना म्हात्रे यांनी काढलेला गाळ रस्त्यावर १५ दिवसांपासून पडलेला आहे. तो पुन्हा पसरुन दुगंधी पसरते, आणि रोगराई पसरते. मग काढलेला कचरा उचलण्याची ही पध्दत कधी बदलणार असा सवाल केला. यावेळी किशोरी पेडणेकर, अश्रफ आझमी, यामिनी जाधव, प्रविण मोरजकर, नवनाथ बन, मानसी सातमकर,भास्कर शेट्टी आणि अमेय घोले यांनी याला पाठिंबा देत आपल्या विभागातील नालेसफाईच्या कामांची व्यथा मांडली. यावेळी ही बाब गंभीर असल्याचे सांगत महापौर रितू तावडे यांनी सर्व नगरसेवकांनी मांडलेल्या मुद्दयांचा माहितीचा अहवाल पुढील महापालिका सभेत सादर करावा असे निर्देश देत हा हरकतीचा मुद्दा राखून ठेवला.

कसारा घाटात विशेष वाहतूक आणि पॉवरब्लॉक



■मुंबई। प्रतिनिधी,
मध्य रेल्वेच्या मुंबई विभागात कसारा - इगतपुरी - खर्डी विभागामध्ये ओव्हरहेड इक्विपमेंट (ओएचइ) संदभार्तील अडथळे दूर करण्यासाठी कामे हाती घेण्यात आली आहेत. या कामांसाठी १०, ११ मे रोजी विशेष वाहतूक आणि पॉवर ब्लॉक घेण्यात येणार आहे. परिणामी, सीएसएमटी - कसारा थेट लोकल सेवा बंद असेल. तसेच मेल-एक्स्प्रेस वाहतुकीच्या वेळापत्रकावर परिणाम होणार आहे. मध्य रेल्वे प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, १० आणि ११ मे रोजी दुपारी ३.५० ते सायंकाळी ५.५० या वेळेत इगतपुरी झ खर्डी दरम्यान अप आणि डाऊन मुख्य मार्गावर दोन तासांचा विशेष ब्लॉक घेण्यात येणार आहे. या कालावधीत कसारा मार्गावरील लोकल सेवा पूर्णपणे बंद राहणार आहेत. लोकल सेवांवर परिणाम : सीएसएमटीवरून कसाऱ्याकडे जाणाऱ्या काही लोकल अंशतः रद्द करण्यात येणार आहेत. सीएसएमटीहून अनुक्रमे दुपारी १.१०, २.१७ आणि २.४६ वाजता सुटणाऱ्या कसारा लोकल आसनगावपर्यंतच चालवण्यात येतील. सीएसएमटीवरून १:१०, २:१७ आणि २:४६ वाजता सुटणाऱ्या लोकल आसनगावपर्यंतच चालतील. तसेच, कसारा ते सीएसएमटी दुपारी ३:३५, ४:१६ आणि ५:०२ च्या गाड्या आसनगावहून सुटतील. मेल/एक्स्प्रेस गाड्याः कामायनी, राजधानी, राजगीर, सेवाग्राम, सुलतानपूर आणि गोरखपूर एक्स्प्रेस यांसारख्या प्रमुख गाड्या खर्डी, आटगाव, खडवली आणि टिटवाळा स्थानकांवर काही काळासाठी थांबवण्यात येतील. प्रवाशांनी या ब्लॉकची नोंद घ्यावी आणि अधिक माहितीसाठी मध्य रेल्वेच्या अधिकृत संकेतस्थळाला किंवा यात्री ॲपला भेट द्यावी. पनवेल-मडगांव दरम्यान उन्हाळी विशेष गाड्या : उन्हाळी सुट्ट्यांमुळे कोकण रेल्वेमार्गावर वाढलेल्या प्रवासी गदीर्चा विचार करून मध्य रेल्वेने मडगाव जंक्शन-पनवेल दरम्यान साप्ताहिक उन्हाळी विशेष गाडी चालवण्याचा निर्णय घेतला आहे. गाडी क्रमांक ०११०६ मडगाव जं.-पनवेल विशेष रविवार, १० मे रोजी सायंकाळी ४.३० वाजता मडगाव येथून सुटून दुसऱ्या दिवशी पहाटे ४ वाजता पनवेलला पोहोचेल. परतीची गाडी क्रमांक ०११०५ पनवेल-मडगाव विशेष सोमवार, ११ मे रोजी सकाळी ५.४५ वाजता पनवेलहून सुटून त्याच दिवशी सायंकाळी ६.१० वाजता मडगावला पोहोचेल. ही गाडी करमळी, थिविम, सावंतवाडी रोड, कुडाळ, सिंधुदुर्ग, कणकवली, वैभववाडी रोड, राजापूर रोड, विलावडे, आडावली, रत्नागिरी, संगमेश्वर रोड, चिपळूण, खेड, माणगाव, रोहा आणि पेण येथे थांबणार आहे.

भाईंदरमध्ये हत्या की अपघात ? स्थानिक पोलिसांचा तपास सुरू



■भाईंदर। प्रतिनिधी,
भाईंदर पूर्वेच्या नवघर रोड परिसरात रविवारी सकाळी एका ५८ वर्षीय व्यक्तीचा मृतदेह खिडकीच्या लोखंडी ग्रीलमध्ये मान अडकलेल्या अवस्थेत आढळून आल्याने हा घातपात आहे की अपघात, याबाबत परिसरात उलटसुलट चर्चा सुरू आहेत. मयत व्यक्तीचे नाव इंद्रजित हरिनाथ यादव (वय ५८ वर्ष, रा. ए/विकास उद्योग नगर, भाईंदर फाटक रोड, भाईंदर पूर्व) असे असून तपास अधिकारी पोलीस उपनिरीक्षक विष्णू फडके हे अधिक तपास करत आहेत. भाईंदर पूर्वेच्या नवघर रोडवरील क्लासिक स्टील इंडस्ट्रीमध्ये रविवारी सकाळी ही घटना उघडकीस आली. मृत व्यक्तीचे शरीर विचित्र स्थितीत लटकलेले होते. त्यांचे अर्धे शरीर खिडकीच्या आत तर अर्धे शरीर खिडकीच्या बाहेर लटकलेले होते. हे दृश्य पाहून परिसरात भीतीचे वातावरण पसरले. घटनेची माहिती मिळताच नवघर पोलीस ठाण्याचे अधिकारी आणि कर्मचार्यांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर पोलिसांनी तत्काळ सदरील मृतदेह ताब्यात घेऊन पंचनामा केला. प्राथमिक तपासासाठी फॉरेन्सिक टीमचीही मदत घेतली जात आहे. पोलिसांनी व्यक्त केलेल्या प्राथमिक अंदाजानुसार, हा एक दुर्दैवी अपघात असण्याची शक्यता आहे. संबंधित व्यक्तीचा मोबाईल खिडकीबाहेर पडला होता. तो मोबाईल उचलण्यासाठी खिडकीतून वाकले असताना त्यांचा तोल गेला असावा आणि मान ग्रीलमध्ये अडकली असावी. ग्रीलमध्ये मान घट्ट अडकल्याने श्वास गुदमरून त्यांचा मृत्यू झाला असावा, असा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात आला आहे. मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. आम्ही सर्व बाजूंनी तपास करत आहोत. शवविच्छेदन अहवालानंतरच हा अपघात होता की घातपात, हे स्पष्ट होईल असे नवघर पोलिसांकडून सांगण्यात आले आहे. औद्योगिक वसाहतीत अशा प्रकारे मृतदेह सापडल्याने कामगारांमध्ये आणि स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

मीरा-भाईंदरमधील २५४ एकर जमीन सरकारीच; महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा दावा, जमीन बिल्डरला देण्याच्या निकालाविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात जाणार

■मीरा-भाईंदर। प्रतिनिधी,
राज्य सरकारच्या मालकीची मीरा-भाईंदर येथील कोट्यवधी रुपये कमतीची सुमारे २५४.८८ एकर जमीन दोन बिल्डरला देण्याच्या मुंबई उच्च न्यायालयाच्या निकालाला आव्हान देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. की जमीन सरकारी मालकीची असून उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका दाखल करण्यात येणार असल्याची माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शनिवारी दिली. राज्य सरकारच्या मालकीच्या मीरा-भाईंदर येथील मौजे भाईंदर क्षेत्रातील २५४.८८ एकर जमिनीवर १९४८ सालापासून सरकारची कोणतीही पूर्वपरवानगी न घेता या जमिनीच्या महसुली नोंदींमध्ये फेरफार करण्यात आले. मुंबई उच्च न्यायालयाने ३० एप्रिल २०२६ ही जमीन दी इस्टेट इन्वेस्टमेंट आणि मीरा रियल इस्टेट डेव्हलपर्स या दोन बिल्डरला देण्याचा निकाल दिला. ही जमीन राज्य सरकारच्या मालकीची असल्याने उच्च न्यायालयाचा निकाल अनपेक्षित आहे. त्यामुळे या निर्णयाच्या विरोधात महाराष्ट्र सरकारची बाजू भक्कमपणे मांडण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात अनुमती याचिका दाखल करण्याचे निर्देश देण्यात आल्याचे बावनकुळे यांनी सांगितले.



खासगी जमीनदारांचे मूळ उघड करा : संजय राऊत
दरम्यान, या प्रकरणातील सर्व खाजगी जमीनदारांचे आणि कंपन्यांची नावे नकोत तर त्यांचे मूळ आणि कुल जनतेसमोर उघड करा, अशी मागणी शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी केली आहे. रियल इस्टेट, मिरा सॉल्ट वर्क्स इत्यादी कोण-कोण आहेत ? असा सवाल त्यांनी शनिवारी एक्स या समाज माध्यमातून केला.

कंपनी' आणि नंतर 'मिरा सॉल्ट वर्क्स' यांची नावे बेकायदेशीरपणे लावण्यात आली. १९५८ मध्ये मिठागरांच्या वापरामुळे या जमिनीवर केंद्र सरकारच्या सॉल्ट विभागाचे नाव लावण्यात आले. त्यानंतर जमिनीच्या मालकी हक्कावरून प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले. तेव्हा, ठाणे जिल्हाधिकारी यांच्याकडे अपील करण्यास सर्वोच्च न्यायालयाने सांगितले. २००२ साली जिल्हाधिकाऱ्यानी या जमिनीवरील मीरा सॉल्ट कंपनीचा दावा फेटाळून ती संपूर्ण जमीन सरकारकडे वर्ग करण्याचे आदेश दिले होते. मात्र, याविरोधात २०१९ साली या कंपन्यांनी आणि केंद्र सरकारच्या मीठ आयुक्तांनी मुंबई उच्च न्यायालयात प्रथम अपिल केले. ३० एप्रिल रोजी केंद्र सरकारच्या मीठ आयुक्तांचे अपिल न्यायालयाने फेटाळून ही जागा मीरा सॉल्ट वर्क्स यांच्या मालकीची असल्याचा निकाल दिला. वास्तविक, उच्च न्यायालयाच्या निकालामध्ये प्रथम अपिल हे मेंटेनिबिलिटीच्या मुद्दावर होते. परंतु, उच्च न्यायालयाने ते गुणवत्तेवर निर्णित केले. त्यामुळे 'मिरा रियल इस्टेट डेव्हलपर्स' या खासगी विकासकांचे नाव सरकारी जमिनीवर कायम राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे. ही बाब जनतेच्या आणि सरकारच्या कायदेशीर अधिकारांवर गदा आणणारी असल्याने बावनकुळे यांनी तातडीने सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्याचा निर्णय घेतला आहे. ही जमीन सरकारच्या मालकीची आहे. महसूल नोंदी बदलून सरकारी जमिनी हडपण्याचे प्रयत्न आम्ही हाणून पाडू. या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयात आम्ही सरकारची बाजू पूर्ण ताकदीने मांडून ही जमीन सरकारच्याच ताब्यात ठेवू, असे बावनकुळे यांनी सांगितले. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम २९ (३) (क) ची तरतुदीचा हवाला देत त्यांनी ही जमीन सरकारी असल्याचा सप्रमाण दावा केला आहे.

न्यायालयाने महाराष्ट्राच्या जनतेची इतकी मोठी सरकारी जमीन खासगी जमीनदाराला कशी दिली? ही फक्त कायदेशीर लढाई नाही, ही जनतेच्या मालकीच्या जमिनीची लूट आहे. २९५ एकर जमीन खासगी हातात गेली तर विकास, रस्ते, रुग्णालय किंवा जनहिताचे कोणते काम होणार ? असा सवाल करत राऊत यांनी महाराष्ट्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात शेवटपर्यंत पूर्ण ताकदीनिशी लढा द्यावा. तसेच या प्रकरणात कोणत्या राजकीय नेत्यांचा यात हात आहे, हेही स्पष्ट करावे, अशी मागणीही राऊत यांनी केली आहे.

रेल्वे स्थानकांवर थुंकणाऱ्यांचा सुळसुळाट!

पश्चिम रेल्वेची एप्रिलमध्ये २,६५७ प्रवाशांवर कारवाई



■मुंबई। प्रतिनिधी,
मुंबई उपनगरी रेल्वे स्थानकांवरील स्वच्छतेचा प्रश्न गंभीर बनत चालला असून स्थानक परिसरात धुंकणे आणि कचरा टाकण्याच्या प्रकारांमध्ये मोठी वाढ झाल्याचे समोर आले आहे. विशेषतः पान, गुटखा आणि तंबाखू खाऊन प्लॅटफॉर्म, जिने, रेल्वे पूल आणि रेल्वे रुळांच्या परिसरात धुंकणाऱ्यांचे प्रमाण वाढल्याने पश्चिम रेल्वे प्रशासनाने कठोर कारवाई सुरू केली आहे.पश्चिम रेल्वेने एप्रिल २०२६ मध्ये अशा प्रकारांविरोधात विशेष मोहीम राबवत २ हजार ६५७ प्रवाशांवर कारवाई केली. गेल्या वर्षी याच कालावधीत केवळ २२७प्रकरणे नोंदविण्यात आली होती. त्याच्यातुलनेत यंदा कारवाईच्या संख्येत तब्बल १२ पट वाढ झाली आहे. दंड वसुलीतही मोठी वाढ झाली असून, गेल्या वर्षी ४२ हजार ५० रुपये दंड वसूल करण्यात आला होता. यंदा ही रक्कम ५ लाख ३७हजार रुपयांहून अधिक झाली आहे. म्हणजेच दंड वसुलीत सुमारे ११७९ टक्क्यांची वाढ झाली आहे.

स्थानकांची स्वच्छता धोक्यातः

रेल्वेप्रशासनाच्यामाहितीनुसार, अनेक प्रवासी प्लॅटफॉर्मवरील कोपरे, जिन्यांच्या भिंती, एस्केलेटर परिसर तसेच फलाटांच्या टोकांवर सर्रास थूकताना आढळत आहेत. त्यामुळे स्थानकांच्या स्वच्छतेवर विपरीत परिणाम होत असून दुगंधी आणि अस्वच्छतेमुळे प्रवाशानाही त्रास सहन करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर पश्चिम रेल्वेने रेल्वे सुरक्षा बल, तिकीट तपासनीस आणि स्वच्छता पथकांच्या मदतीने विशेष तपास मोहीम सुरू केली आहे.

-४२,०५० रुपये दंड गेल्या वर्षी वसूल करण्यात आला.

२,६५७प्रवाशावर २०२६ मध्ये अशा प्रकारांविरोधात विशेष मोहीम राबवत कारवाई केली.

२२७प्रकरणे गेल्या वर्षी याच कालावधीत नोंदविण्यात आली.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com